# ‘स्त्रियांवरील हिंसा’; आज खुली चर्चा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने आज, शुक्रवारी दुपारी तीन वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त ‘स्त्रियांवरील हिंसा’ या विषयावर विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींची खुली चर्चा आयोजित करण्यात आली आहे. या चर्चेस अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, तनुजा शिपूरकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# 'स्त्रियांवरील हिंसा'वर आज चर्चा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने शुक्रवारी (दि.३) दुपारी तीन वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये सावित्रीबाई फुले जयंती निमित्त 'स्त्रियांवरील हिंसा' या विषयावर विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींची खुली चर्चा आयोजित करण्यात आली आहे. चर्चेस अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे, तनुजा शिपूरकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# मराठी पत्रकार दिनानिमित्त विद्यापीठात सोमवारी कार्यशाळा

कोल्हापूर : मराठी पत्रकार दिनानिमित्त सोमवारी (ता. ६) शिवाजी विद्यापीठात 'आपत्ती व्यवस्थापन आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात ही कार्यशाळा आहे. कार्यशाळेचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्या हस्ते होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असणार आहेत. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. जय सामंत हे आपत्ती व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारच्या सत्रात दै. 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव 'आपत्ती व्यवस्थापन आणि वृत्तपत्रे' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते 'आपत्ती व्यवस्थापन आणि सोशल मीडिया' यावर मुद्दे मांडतील. पत्रकार संदीप राजगोळकर 'इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर भूमिका मांडतील. या कार्यशाळेत पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. निशा पवार संपादित 'वुमेन इन रिजनल टेलिव्हिजन चॅनेल्स' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. निशा पवार यांनी दिली आहे.